# प्रस्तावना

सांगली हे दक्षिण महाराष्ट्रातील प्राचीन शहर असून ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय व व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द आहे. परंतु सांगली शहरास धार्मिक महत्व प्राप्त होण्यास जे घटक कारणीभूत झाले त्यापैकी महत्वाचा घटक म्हणजे श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराची स्थापना होय. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात गणेश पूजनाला असीम महत्व आहे. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून जनजागृती व लोकसंघटन निर्माण करावयाचा अभिनव प्रयत्न केला होता. मुख्यतः महाराष्ट्राबरोबर संपूर्ण राष्ट्रांमध्ये इतरत्र गणेशोत्सवाची लोकप्रियता आणि व्याप्ती झपाट्याने वाढीस लागली आहे. महाराष्ट्रात अष्टविनायक व पुण्यातील दगडूशेठ हलवाई या गणपतीच्या स्थानांनी वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.

महाराष्ट्रातील प्रसिध्द गणपती मंदिरांच्यामध्ये सांगलीतील श्री गणपती पंचायतन या मंदिराचा अंतर्भाव केला जातो. दीडशे वर्षापूर्वी बांधण्यात आलेले व धार्मिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक महत्व असलेले हे मंदिर भक्तजनांचे प्रमुख आकर्षण आहे. या मंदिराचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपासना होत असलेल्या गणपतीची मुर्ती दोन फुटी आहे तर गणपती उत्सवात दीडशे वर्षापूर्वी कागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या दोन मुर्त्या पूर्वपरंपरेने वापरल्या जातात. या मुर्त्यांचे विसर्जन केले जात नाही. त्यामुळे निर्माण होणारे जलप्रदुषणापासून व वायुप्रदुषणापासून हे स्थान मुक्त आहे. शिवाय या मंदिर परिसरात फक्त पंचायतन देवतांचीच उपासना होत नसून या मंदिराद्वारे मोफत अन्नछत्र, अनाथांसाठी विशेष सवलती, मोफत वैद्यकीय सेवा केंद्र, अल्प किंमतीत संगणकाचे ज्ञान तसेच उर्दू व जर्मन भाषेचे ज्ञान मोफत देण्याचे वर्ग सुरु आहेत. या उपक्रमांद्वारे सर्वधर्मसभभावाचा ऐतिहासिक वारसा जपला जात आहे. त्यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या अफाटपणे वाढत आहे. समस्त सांगलीतील जनतेचे आराध्य दैवत गणपती असून हे मंदिर म्हणजे

सांगलीचे वैशिष्ट्य मानले जाते. या संशोधिकेचा जन्म आणि बालपण मुंबई शहरात गेल्यामुळे तेथे साजरा होणाऱ्या गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सांगलीतील या मंदिराची वैशिष्ट्ये तिला प्रकर्षाने जाणवली. म्हणूनच **श्री गणपती पंचायतन संस्थान सांगली एक ऐतिहासिक अभ्यास १९५० ते २००५** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

सांगलीचे विविध अंगानी विशेष संशोधन झाले आहे. त्यामध्ये डॉ. बी. एन. सरदेसाई यांनी सांगली संस्थानाची प्रशासकीय बाजू शिवाजी विद्यापीठास सादर केलेल्या एम्.फील व पीएच.डी. प्रबंधातून मांडली आहे. तर डॉ. सौ. उदगांवकर यांनी संस्थानाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय पार्श्वभूमी पुणे विद्यापीठास सादर केलेल्याा पीएच.डी. प्रबंधातून मांडली आहे. परंतु धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने महत्वाच्या असलेल्या सांगली शहरातील " श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराचा अभ्यास " अथवा संशोधन झालेले नाही किंवा कोणत्याही संशोधकांनी आपल्या संशोधनासाठी या विषयाची निवड केलेली नाही. म्हणून ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक वारशाचे प्रतिनिधित्व करीत असलेले हे मंदिर अभ्यासकांकडून दुर्लक्षित राहिल्याने ही त्रुटी काही अंशी दूर करण्यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या निर्मितीसाठी प्राथमिक अप्रकाशित साधनांमधील श्री गणपती पंचायतन संस्थानच्या दप्तरातील मोडी लिपीतील कागदपत्रे, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अप्रकाशित कागदपत्रे, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यालयातील अप्रकाशित व प्रकाशित कागदपत्रे, पोलीस मुख्यालयातील कागदपत्रांचा उपयोग केला आहे. त्याबरोबरच प्रकाशित प्राथमिक साधनांमध्ये गो. ज. कुंठे लिखित ' सांगली संस्थानाचे संस्थापक थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे चरित्र ', आर. सी. बर्क लिखित ' नोटस् ऑन दि स्टेट ', पी. एम. लिमये लिखित ' सांगली स्टेट (१९१० ते १९४८) मोनोग्राफ ऑन द रुल ऑफ कॅप्टन सर चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन ', वि. अ. पटवर्धन लिखित ' दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या विलिनीकरणाची कथा ', य. न. केळकर

व ना. के. जोशी लिखित ' श्रीमंत पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांची दिनचर्या खंड - १-२', वि. ग. पटवर्धन लिखित ' चित्तपावन कौंडिण्यगोत्री पटवर्धन कुल वृत्तान्त ' तसेच दुय्यम प्रकाशित संदर्भ साधनांमध्ये अविनाश टिळक लिखित ' सांगली आणि सांगलीकर ', वि. ग. पटवर्धन लिखित ' परमपुज्य ब्रह्मीभूत हरीभटजीबाबा यांचे चरित्र ', अमरेंद्र गाडगीळ लिखित ' श्री गणेश कोश ', गो. नी. दांडेकर लिखित ' गणेश पुराण ', ऋग्वेदी लिखित ' आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास ', श्री. भा. वर्णेकर लिखित ' भारतीय धर्म व तत्वज्ञान ', एन. जोशी लिखित ' मुदगलपुराण ' याशिवाय सांगली, कोल्हापूर जिल्ह्याची गॅझेटियर, मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृतिकोश, वृत्तपत्रे, मासिके, प्रश्नावली, मुलाखती व अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंधाचा आधार घेऊन हा शोधप्रबंध सहा प्रकरणात पूर्ण केला आहे. या प्रकरणांची विभागणी खालीलप्रमाणे केली आहे.

१) सांगली - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप.

२) श्री गणपती दैवत : धार्मिक आध्यात्मिक स्वरुप.

३) श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिर : निर्मिती आणि विकास.

४) श्री गणपती पंचायतन मंदिर : प्रशासन आणि अर्थव्यवस्था इ.स. १९५०-२००५

५) श्री गणपती पंचायतन मंदिर गणेशोत्सव परंपरा.

६) उपसंहार.

**सांगली - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप :** या प्रथम प्रकरणामध्ये सांगलीचा प्राचीन इतिहास, पटवर्धन घराण्याचा पूर्व इतिहास व श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या कारकिर्दीत झालेली सांगली संस्थानाची निर्मिती आणि श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराच्या स्थापनेमुळे सांगलीला प्राप्त झालेले धार्मिक व सांस्कृतिक महत्व स्पष्ट केले आहे. पुढील काळात श्रीमंत धुडिंराव तात्यासाहेब पटवर्धन, कॅप्टन आर. सी. बर्क, श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) या सर्वांच्या कारकिर्दीतील सांगलीच्या शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक व राजकीय विकासाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला

असून संस्थानाच्या विलिनीकरणानंतर वसंतदादा पाटलांनी घडवून आणलेल्या सांगलीच्या प्रगतीचा आढवा घेतला आहे.

**श्री गणपती दैवत : धार्मिक आध्यात्मिक स्वरुप :** या दुसऱ्या प्रकरणामध्ये श्री गणपती नावाची व्युत्पत्ती व गणपती जन्म व्युत्पत्तीच्या विविध कथांचे निरनिराळ्या पुराणांमधील संदर्भ दिले आहेत. परंतु याशिवाय गणेशाच्या चार युगातील अवतारांचे महत्व व गणेशाच्या बारा नावाच्या अन्वयार्थाचे स्पष्टीकरण केले आहे. तसेच काही विद्ववानांनी व इतिहासकारांनी गणेशाची आराधना प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे ज्या पुराव्यांच्या आधारे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे त्या पुराव्यांचे संदर्भ या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जगातील सर्वात प्राचीन सुसंबध्द वैदिक वाङमयातील ऋग्वेद या ग्रंथात गणेशाचा उल्लेख कशाप्रकारे झाला आहे याचे विवेचन केले आहेच. शिवाय उपासकाला असीम सामर्थ्य देऊन त्याचे दीनवाणे जीवन पारमार्थिकदृष्ट्या समृध्द आणि तेजोमय करण्यासाठी मनुष्य जीवनात गणपती अथर्वशीर्षाचे महत्व व त्याच्या अर्थाचे स्पष्टीकरण दिले आहे. गुप्तकालात (६ वे शतक) संपूर्ण भारतभर भक्तिमार्गी पंथांचा प्रसार झाला होता. यामध्ये गाणपत्य सांप्रदायास कितपत महत्व प्राप्त झाले होते किंवा त्या संप्रदायाच्या सहा पंथांमध्ये असलेला फरक विशद केला आहे. तसेच परदेशातील गणपतीच्या प्रतिमा व गणपतीची नावे आणि महाराष्ट्रातील गणपती उपासना व गणपतींच्या नावांचा तुलनात्मक भेद विशद करुन उपासना विधीमध्ये वापरण्यात येणाऱ्या वनस्पतींचे आयुर्वेदिक महत्व व इतर देवतांच्या मानाने श्री गणपतीच्या आकारातील विविधतेचा अभ्यास केलेला आहे.

**श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिर : निर्मिती आणि विकास :** या तिसऱ्या प्रकरणामध्ये श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराच्या बांधकामाची विभागणी चार टप्प्यांमध्ये केली असून पहिल्या टप्प्यामध्ये श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या कारकिर्दीत मंदिर बांधकामाचा विकास व त्यांनी मंदिर परिसरात बांधकामासाठीचे जे निरनिराळे विभाग सुरु केले होते त्या सर्व विभागांची मांडणी श्री गणपती पंचायतन संस्थानच्या त्या

काळातील उपलब्ध असणाऱ्या मोडी लिपी कागदपत्रांवरुन केली आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये श्रीमंत धुडिरांव तात्यासाहेब पटवर्धनांच्या कारकिर्दीत मंदिर परिसराच्या आवाराची डागडूजी व इतर किरकोळ बांधकामे झाल्याचे संदर्भ मोडी कागदपत्रांच्या आधारे स्पष्ट केले आहेत. तिसऱ्या टप्प्यामध्ये श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (दुसरे) श्री गणपती मंदिराचा सभामंडप व महाद्वाराचे महत्वाचे कार्य कशा पध्दतीने पूर्णत्वास नेले होते त्याचा अभ्यास केला आहे. तर चौथ्या टप्प्यामध्ये श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धनांनी मंदिराचा जीर्णोध्दार मंदिर परिसराचे सुशोभिकरण करुन नेत्रदिपक प्रगती घडवून आणली आहे. त्याचबरोबर या परिसरात भाविकांच्या दृष्टीने व अनाथ, अपंग, गरजू लोकांसाठी संस्थानाच्या वतीने जे विविध उपक्रम राबविले गेल आहेत त्यामुळे मंदिरास आज जे महत्व प्राप्त झाले आहे त्याचा अभ्यास केला आहे. शिवाय आजही मंदिरात पूर्व परंपरेने जे धार्मिक विधी पार पाडले जातात त्याची माहिती दिली आहे.

**श्री गणपती पंचायतन मंदिर : प्रशासन आणि अर्थव्यवस्था (इ.स.१९५०-२००५):**
या चौथ्या प्रकरणामध्ये श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (पहिले) श्री गणपती पंचायतन मंदिरास उत्पन्नाचे स्त्रोत प्राप्त करुन देण्यासाठी सांगली संस्थानातील तालुक्याच्या जमिनी इनाम करुन दिल्या होत्या. या इनाम जमिनींपासून मिळणारा महसूल व या जमिनीतून उत्पादित पिकांचा आढावा घेतला आहे. याशिवाय व्यापारी पेठा, फळबागा, पेव भाडे, पागाखान्याचे उत्पन्न, निधी व अभिषेकाच्या माध्यमातून कशाप्रकारे मंदिरास उत्पन्नाची प्राप्ती होत असे याचा अभ्यास केला आहे तर या उत्पन्नाचा विनियोग प्रशासन, मंदिराचा नित्य खर्च, नैमित्तिक खर्च, पागाखाना व फळबागांवर होणारा खर्च व महत्वाचे म्हणजे मंदिराच्या विकासासाठी वार्षिक दुरुस्त्या केल्या जातात. त्यावरील खर्च या माध्यमातून होतो. या सर्व जमाखर्चाच्या बाबींचा अभ्यास श्री गणपती पंचायतन संस्थानच्या जमाखर्चाच्या अंदाजपत्रकानुसार केला असून या आर्थिक स्त्रोतांचे महत्व स्पष्ट केले आहे. याशिवाय या प्रकरणात मंदिराची प्रशासकीय बाजू मांडली असून प्रशासनाच्या निरनिराळ्या विभागांची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

माहिती दिली आहे. मंदिराचे सर्व प्रशासन कार्य सांभाळण्यासाठी या प्रशासकीय विभागांचे असणारे महत्व स्पष्ट केले आहे.

**श्री गणपती पंचायतन मंदिर गणेशोत्सव परंपरा** : या पाचव्या प्रकरणामध्ये गणेशोत्सवाची प्राचीनता, पेशवे काळातील नानासाहेब पेशवे, थारेले माधवराव पेशवे व सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत गणेशोत्सवादरम्यान झालेल्या खर्च व उत्सवाचे स्वरुप कशा प्रकारचे होते याच्या नोंदी घेतल्या आहेत. याशिवाय सांगलीच्या संस्थानातील गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये, उत्सवांतर्गत साजरे होणारे विविध कार्यक्रम, गणपती विसर्जन मिरवणुकीचे बदलते स्वरुप या बाबींचा अभ्यास केला आहेच, परंतु याबरोबरच स्वातंत्र्यपूर्व काळातील सांगली शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरुप व स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरुपाचाही आढावा घेतला आहे. उत्सवामुळे मानवी मन, चिंता व्यंथामधून मुक्त राहते व मनाला काही कालावधीपुरता विरंगुळा प्राप्त होतो. शिवाय उत्सवादरम्यान अथवा कायमस्वरुपी काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे समाजात विधायक उपक्रम राबवित असतात, अशा उपक्रमांमुळे समाजाची काही अंशी प्रगती घडून येतेच. परंतु या चांगल्या कार्याबरोबच उत्सवकाळात निर्माण होणाऱ्या विविध प्रदुषणांमुळे मात्र निसर्गाचा समतोल कशा पध्दतीने बिघडत चालला आहे याचा सविस्तर अभ्यास केला आहे. शिवाय भावी काळात गणेशोत्सवाचे स्वरुप कसे असावे याविषयीचे विवेचन केले आहे.

**उपसंहार** : या सहाव्या प्रकरणात एक ते पाच प्रकरणांच्या आधारावर निष्कर्ष काढले आहेत. सध्या सांगली हे दक्षिण महाराष्ट्रातील महत्वाचे शहर म्हणून गणले जात असले तरी मूळ सांगलीचा ओबडधोबड परिसर वैशिष्ट्यपूर्ण बनला तो पटवर्धन घराण्यामुळे, आज सांगलीचे वैशिष्ट्य समजल्या जाणाऱ्या श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराची स्थापना पटवर्धनांनीच केली असून हे मंदिर महाराष्ट्रातील एक धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. गणपतीची उपासना प्राचीन काळापासून प्रचलित असलेली दिसून येते. भारताप्रमाणेच परदेशातही गणेश उपासनेस महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रात पेशवे काळात

गणेश उपासना अधिक महत्व पावली असल्यामुळे अनेक गणेश मंदिरांची निर्मिती झाली. पटवर्धन हे पेशव्यांचे सरदार होते व त्यांची श्री गणपतीवर अत्यंत श्रध्दा होती. त्यामुळे श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धनांनी (पहिले) आराध्य दैवत गणपतीवर असलेल्या श्रध्देतून श्री गणपती पंचायतन मंदिराची स्थापना झाली. या मंदिराची बांधणी भव्य, सुबक व वैशिष्ट्यपूर्ण केली असल्यामुळे दीडशे वर्षाचा कालावधी लोटा असला तरी आजही मंदिराची नवीन उभारणी झाल्यासारखे वाटते. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची मंदिरे क्वचितच आढळतात. मंदिरास सांगली व सांगलीवाडी ही गावे इनाम करुन देण्यापाठीमागे चिंतामणराव आप्पासाहेबांच्या दूरदृष्टीचे दर्शन घडते. मंदिराची आर्थिक बाजू भक्कम असल्याने मंदिराचा सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो. प्रशासनात कार्यात सर्व जातीधर्माच्या लोकांना सामावून घेतले असल्यामुळे सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केलेला पहावयास मिळतो. मंदिराचा गणेशोत्सवही त्याच्या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे सांगली व सांगली बाहेरच्या लोकांचे आकर्षण बनला आहे. मंदिराच्या आवारात गरीब, गरजू, अनाथ, अपंग लोकांसाठी विविध उपक्रम राबविले जात असल्यामुळे आज या मंदिरास अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फील. पदवीसाठी श्री गणपती पंचायतन संस्थान एक ऐतिहासिक अभ्यास १९५० ते २००५ या विषयावर संशोधन करीत असताना मला अत्यानंद होत आहे. या संशोधन कार्यात ज्यांचे अनमोल मार्गदर्शन, सहकार्य, प्रेरणा व प्रोत्साहन लाभले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही माझी औपचारिकता नसून ते मी माझे परम कर्तव्य समझते.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी उपयुक्त असलेली श्री गणपती पंचायतन संस्थानच्या दप्तरातील सर्व मोडी लिपीतील कागदपत्रे जमा-खर्चाची अंदाजपत्रके उपलब्ध करुन देण्याचे अतिशय मौलाचे कार्य मुख्यत: श्री गणपती पंचाथतन संस्थानचे विश्वस्त श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन यांनी पार पाडले. यांच्या सहकार्यामुळेच माझे शोधप्रबंधाचे कार्य पूर्णत्वास गेले आहे. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार. श्री गणपती पंचायतनचे व्यवस्थापक श्री. बी.

के. जाजू यांनी या संशोधन कार्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती पुरवून सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार. पुजारी रमेश पाटणकर, जमादार मारुती अकीमट्टी, हिशेब तपासनीस गोपाळ कुलकर्णी व मंगल माने या सर्वांनी वेळोवेळी लागणारी सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन देऊन फार मोठे सहकार्य केले आहे त्याबद्दल सर्वांचे आभार. मोडी लिपीतील कागदपत्रांचा मराठी भाषेत अनुवाद करण्यासाठी तरुण भारत वृत्तपत्राचे वार्ताहर मानसिंग कुमठेकर यांचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

इतिहास विभागप्रमुख आदरणीय डॉ. एम. ए. लोहार, डॉ. ए. आर. भोसले, डॉ. खणे, डॉ. सौ. नंदा पारेकर, डॉ. सौ. पद्मजा पाटील व अविनाश पाटील या सर्व गुरुवर्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्याबद्दल सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार. डॉ. कविता गगराणी, उदय खेडकर यांच्या सहकार्याबद्दल आभार. शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय कोल्हापूर, करवीर नगरवाचनालय कोल्हापूर, सांगलीमधील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली जिल्हा नगर वाचनालय व सिटी हायस्कूल या सर्व ग्रंथालयातील ग्रंथपालांना महत्वाचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन दिले त्याबद्दल सर्वांचे आभार.

माझे गुरुवर्य श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक श्री. एस. बी. माणगांवकर, डॉ. अमर पांडे, डॉ. सौ. शंकुतला चव्हाण, डॉ. सौ. उदगांवकर, सौ. ऋतुजा खोत या सर्वांचे सहकार्य मिळाल्याबद्दल त्यांचे आभार. ज्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळे या शोधप्रबंधाचे काम पूर्णत्वास गेले ते माझे सासरे श्री. महादेव कोळेकर, सासू सौ. मालन कोळेकर, वडील श्री. पांडूरंग सरगर, आई सौ. यशोदा सरगर व पती श्री. चंद्रशेखर कोळेकर या सर्वांनी मला कायमचे ऋणाईत ठेवले असल्याने त्यांचा मला भावुकतेने उल्लेख करावासा वाटतो. माझ्या एम्. फील. च्या सर्व सहकाऱ्यांनी वेळोवेळी सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभार. माझे सस्नेही अबोली शितोळे, रुपाली चौगुले, ज्योती सौदंडे, वैशाली जोशी, प्रा. सुरेश शिखरे, शिवाजी जाधव, तानाजी हवलदार,

कुमार पाटील व रवि पाटील या सर्वांनी केलेल्या सहकार्यामुळे माझे शोधप्रबंधाचे काम पूर्णत्वास गेले याबद्दल या सर्वांचे आभार. या प्रबंधाच्या संगणकीय प्रती अल्पावधीत सुबकपणे पूर्ण करुन दिल्याबद्दल सिध्दी कॉपीअर्स, सांगली चे श्री. व सौ. गुप्ता यांची मी अत्यंत आभारी आहे.

**सौ. पुष्पांजली चंद्रशेखर कोळेकर**

*****